# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## जाहीर दरपत्रक

दि.२४/११/२०२१

**विषय :—** फोटो तयार करणे कामी स्टिक पेपर रोलचे दरपत्रक पाठविणे बाबत.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे नवीन स्वरूपातील श्री.विठ्ठल रुक्मिणी मातेचे चित्रांचे हॉटप्रेस व लॅमिनेशन करूण फोटो तयार करणे कामी आवश्यक असणारे स्टिक पेपर रोल खरेदी करणे कामी दरपत्रके मागवित आहोत. सदरच्या करावयाच्या पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपलेकडील खालील अर्जावर अथवा त्या नमुन्यात सही व शिक्क्यासह दरपत्रक दि. ३०/११/२०२१ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे. सिलबंद पाकीटावर खालील तपशिल नमुद करावा.

‘‘ स्टिक पेपर रोल पुरवठा कामाचे दरपत्रक’’

पुरवठाधारकाचे पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक

उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सोबत दरपत्रक माहिती, अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.

**स्वा/—**
**व्यवस्थापक,**
**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**डबल स्टिक पेपर रोल पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.**

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.**

१. सदर कामाची माहिती, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संत तुकाराम भवन येथे सुचना फलकावर व मंदिर समितीच्या संकेत स्थळावर पहावयास मिळतील.

२. दरपत्रक दिलेल्या सोबत दिलेल्या नमुन्यात स्वरूपात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक डबल स्टिक पेपर रोल पुरवठा कामासाठी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा.

३. सिलबंद दरपत्रक कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दि.३०/११/२०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने पाठवावे. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

४. पुरवठादाराने दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराने पुरवठा आदेश दिले पासुन एक वर्षाचे कालावधीसाठी इकडील मागणीप्रमाणे स्टिक रोलचे पुरवठा करणे आवश्यक आहे.

५. पुरवठा करावयाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | अंदाजीत वर्षासाठी खरेदी नग |
|---|---|
| **डबल स्टिक पेपर रोल** ४०इंच X ५० मिटर | १०० नग |

६. मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे स्टिक पेपर रोल पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही.

७. डबल स्टिक पेपर रोलची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. पुरविण्यात येणारे डबल स्टिक पेपर रोल खराब असल्याचे आढळून आलेस, त्याबाबतची तपासणी करून खात्री केल्यानंतर पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

९. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१०. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

११. स्टिक पेपर रोलचा पुरवठा करणेचे ठिकाण श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे करणे आवश्यक आहे.

१२. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१३. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहतील.

१४. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१५. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१६. तसेच सदरचे डबल स्टीक पुरवठा करणेचा कालावधी हा १ वर्षाचा असेल.

१७. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्‌द केली जाईल.

स्वा/—
कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर,जि.सोलापूर

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

### जाहिर दरपत्रक.

प्रति,

मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय:—डबल स्टीक पेपर रोल डिसेबंर २०२१ ते डिसेंबर २०२२ गरजेनुसार पुरवठा करणे कामी निविदा.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.——————————————————————

पूर्ण पत्ता :— ——————————————————————

——————————————————————

मोबाईल क्रं.:— ——————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरचे डबल स्टीक पेपर रोल डिसेबंर २०२१ ते डिसेंबर २०२२ गरजेनुसार पुरवठा करणे कामाची दि.२४/११/२०२१ रोजीचे दैनिक पुण्यनगरी पुणे व मुंबई आवृतीच्या वृत्तपत्रात ेजाहीरात प्रसिध्द झालेल्या जाहीर दरपत्रकाप्रमाणे डबल स्टीक पेपर रोल दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| अ. क्र. | पुरवठा करणे साहीत्याचे प्रकार | साईज | कालावधी | प्रमाण | कंपनीचे नाव | दर रक्कम रू. (प्रति नग प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डबल स्टीक पेपर रोल | ४०इंच X ५० मिटर | डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ | प्रति नग | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

वरील दर प्रत्यक्ष साईज व कंपनीप्रमाणे डबल स्टीक पेपर रोल सर्व वाहतुक खर्चा सहीत एक वर्षासाठी पुरवठा करणे कामी तसेच सर्व प्रकारचे करासहीत दर आकारण्यात आले

आहेत. तसेच सदर दराने डिसेबंर २०२१ ते डिसेंबर २०२२ पर्यंत करणे त्वरीत पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास मी तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे डबल स्टीक पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०२१ सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. शॉप ॲक्ट लायसन्स / नोंदणी परवाना.
२. पॅन कार्ड.
३. जीएसटी प्रमाणपत्र अन्यथा कर आकरणी उत्पन प्रमाणपत्र ( इनकमटॅक्स प्रमाणपत्र )